प्रेस नोट दिनांक ०६/०३/२०२५

# शहर गुन्हे शाखेकडून, घरफोडी ०१, इतर चोरीचे ०२ असे ०३ गुन्हे उघडकीस,

---

**अ)** दिनांक २६/०२/२०२५ रोजी पो.उप.नि./ मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथक पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हद्दित गस्त करीत असताना, जोडबसणा चौकाचे पुढे जमखंडी पुल, येथील सार्वजनिक रस्त्यावर एक ASHOK LEYLAND कंपनीचे टेम्पोमध्ये, काहीतरी संशयास्पद वस्तु घेऊन जात असताना, इसम नामे- १) शुभम लक्ष्मण पाटील वय- २६ वर्षे, व्यवसाय- ( सिक्युरीटी इंचार्ज ), राहणार- यशवंत नगर घर नं. ५४ बाळे सोलापूर, २) अरिफ नुरुद्दीन सय्यद वय- ३० वर्षे, व्यवसाय- ( गॅस विल्डींग काम) , राहणार- राहुल गांधी झोपडपट्टी पाच्छा पेठ सोलापूर, ३) इरफान बाबु मुच्छाले वय- ३२ वर्षे, व्यवसाय- (टेम्पो ड्रायव्हर), राहणार- ५८५ बी जुना विडी घरकुल कुंभारी ता. द. सोलापूर यांना घेतले. नमूद इसमांकडे चौकशी केली असता, त्यांनी एम.एस.सी. बँकेने सिल केलेल्या शारदा सुत मिल, कुंभारी येथुन सुत मिलमधील मोठया मशनरी, गॅस कटरच्या सहायाने कट करुन, ते टेम्पोमध्ये भरुन विक्री करीता सोलापूर मध्ये आणलेचे सांगितले. त्याप्रमाणे, त्यांच्याकडुन सदर टेम्पो व टेम्पोमधील **०४,६०,१२५/- रुपयांचा** मुद्देमाल भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५ (इ) प्रमाणे ताब्यात घेतला. वरील नमूद मुद्देमाल बाबत अधिक माहिती घेतली असता, त्याबाबत, **वळसंग पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे गु.र.नं.८०/२०२५ भा.न्या.सं.कलम ३०५(a), ३३१(३), ३३१(४) अन्वये, गुन्हा** दाखल असून, सदर कारवाईमुळे सदरचा गुन्हा उघडकीस आला आहे.

**ब)** तसेच, दिनांक ०५/०३/२०२५ रोजी पो.उप.नि./मुकेश गायकवाड व त्यांचे पथकास, एक महिला, चिप्पा भाजी मार्केटच्या बाजुला, सार्वजनिक रस्त्यावरुन चोरीची मालमत्ता विक्री करण्याकरीता अशोक चौकाकडे पायी चालत येणार असल्याची माहिती प्राप्त झाली. त्याअनुषंगाने, महिला नामे- फरजाणा अब्बास शेख, वय- ४२ वर्षे, व्यवसाय- गृहीणी राहणार- ४८४/३ गोदुताई विडी घरकुल, कुंभारी सोलापूर हिस महिला पोलीस अंमलदार यांच्या करवी ताब्यात घेऊन, तिची महिला पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, तिचे ताब्यातून **१,०७,५००/- रुपये किंमतीचे** सोन्या-चांदीचे दागीने हस्तगत करण्यात आले आहेत. त्याबाबत **(१) सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर गु.र.नं. ७६६/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३७९ व (२) सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर गु.र.नं.८१/२०२५ भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये,** दाखल ०२ गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगिरी, मा. श्री.एम. राज कुमार, पोलीस आयुक्त सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री. राजन माने, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उप-निरीक्षक/मुकेश गायकवाड व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार- नंदराम गायकवाड, वाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, अर्चना स्वामी, चालक बाळु काळे यांनी केली आहे.

6/3

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करीता.**